[ १४ ]     ः अपराध क्षमा ः

अपराध क्षमा आता केला पाहीजे । गुरू हा केला पाहिजे ।
अबध्द सुबध्द गुण वर्णियले तुझे ॥ धृ ॥

न कळेची टाळ विणा वाजला कैसा । गुरू हा वाजला कैसा ।
अस्ताव्यस्त पडे नाद हा गेला भलतैसा ॥ अपराध ॥१॥

नाही ताल ज्ञान नाही कंठ सुस्वर । गुरू हा कंठ सुस्वर ।
झाला नाही वाचे वर्ण उच्चार ॥ अपराध ॥२॥

निरंजन म्हणे तुझे वेडे वांकुडे । गुरू हे वेडे वांकुडे ।
गुण दोष न लावावा सेवकाकडे ॥ अपराध ॥३॥